26 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी




कोल्हापूर : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित मतदार जनजागृती रॅलीचा प्रारंभ करताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र खाडे, प्रांताधिकारी सचिन इथापे, महापालिका उपायुक्त ज्ञानेश्वर ढेरे, सहायक आयुक्त बाळासो जगताप, सचिन खाडे, मंगेश शिंदे यांच्यासह अन्य.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शहरात जनजागृती रॅली

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सक्षम करूया युवा व भावी मतदार, लोकशाहीचा हिस्सा होऊया, मतदान करूया, एकच लक्ष मताचा हक्क, अशा घोषणांनी मतदार जनजागृतीपर रॅलीने कोल्हापूर शहर दुमदुमले. बिंदू चौकातून निघालेल्या या मतदार जनजागृती रॅलीतून मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, अशा घोषणा एनएसएस, एनसीसी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींनी दिल्या.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त १८ वर्षांवरील मतदारांमध्ये मतदानाच्या जागृतीसाठी काढण्यात आलेल्या मतदार रॅलीस बिंदू चौकात अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरुवात झाली. बिंदू चौकातून निघालेली मतदार जागृती रॅली पुढे शिवाजी पुतळा-महानगरपालिका-दसरा चौक या मार्गावरून शाहू स्मारक भवन येथे आली. प्रारंभी बिंदू चौकामध्ये नेहरू युवा केंद्राच्या स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर केले. ▶▶ पान २ वर

## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती रॅली

(पान १ वरून) या रॅलीतील सर्वांकडे मतदानाविषयी विविध घोषवाक्यांचे फलक होते, तसेच रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांनी सक्षम करूया युवा व भावी मतदार, मतदारराजा जागा हो, प्रगतीचा धागा हो, लोकशाही बळकटीकरणासाठी सर्वांचा सहभाग, एकच लक्ष मताचा हक्क, अशा विविध घोषणा देण्यात आल्या.

रॅलीमध्ये प्रांताधिकारी सचिन इथापे, उपायुक्त ज्ञानेश्वर ढेरे, सहायक आयुक्त बाळासो जगताप, सचिन खाडे, मंगेश शिंदे, जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, निवडणूक समन्वयक संजय कुंभार, कोल्हापूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय व तहसीलदार कार्यालयाकडील कर्मचारी, एन.सी.सी., एन.एस.एस.चे छात्र, शिवाजी विद्यापीठ, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज, केएमसी कॉलेज, महावीर विद्यालय, विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, मेन राजाराम हायस्कूलचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

26 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# लोकशाही बळकटीसाठी मतदानाचा हक्क बजावावा

## विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांचे आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्येकाने त्यांना मिळालेला मतदानाचा पवित्र हक्क १०० टक्के बजावावा, असे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुधवारी येथील शाहू स्मारक भवनामध्ये मतदार जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी होते.

लोकशाहीने नागरिकांना दिलेला मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य असल्याचे स्पष्ट करून विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील म्हणाले, मतदानाची सुटी ही एन्जॉय करण्यासाठी नसून ती राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी आहे. याची जाण ठेवून प्रत्येकाने मतदान करून भारतीय लोकशाही समृद्ध आणि बलशाली करण्यास सक्रिय व्हावे.

निवडणूक ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतील आणि परिवर्तनातील आपणही घटक बनू या, यासाठी परिवर्तनाची सुरुवात स्वतः मतदान करून करावी व इतरांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहन करून विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील म्हणाले, १८ वर्ष पूर्ण केलेल्या प्रत्येकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवून नवमतदार होण्याचा बहुमान मिळवावा. आगामी निवडणुकामध्ये मतदारांनी मुक्त, निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा. कोणत्याही प्रलोभनाला, आमिषाला बळी पडू नये, असे आवाहनही त्यांनी केले.



कोल्हापूर : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृतीसाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील. सोबत जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, कुणाल खेमणार आदी.

जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी म्हणाले, 'सक्षम करू या युवा व भावी मतदार' हे घोषवाक्य घेऊन संपूर्ण देशभर मतदार जागृती अभियान गतिमान केले असून मतदार नोंदणीची निरंतर प्रक्रिया सुरू असून १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येकानेच आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे. प्रत्येकाने मतदानाचा पवित्र हक्क बजावून भारतीय लोकशाही अधिक बळकट आणि समृद्ध करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी म्हणाले, मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपला मतदानाचा हक्क निर्भयपणे बजावावा. मतदारांनासाठी प्रलोभनाच्या काही घटना घडत असल्यास त्याची माहिती प्रशासनाला निर्भयपणे द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मतदार जागृतीनिमित्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा तसेच उत्कृष्ट बीएलओ यांचा सत्कार करण्यात आला. उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र खाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आभार मानले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, पोलीस अधीक्षक महादेव तांबडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर, विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदिवडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, उपायुक्त ज्ञानेश्वर ढेरे, तहसीलदार उत्तम दिघे, उपमुख्य कार्यकारी चंद्रकांत वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, नवमतदार, विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

26 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ




कोल्हापूर : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त १८ वर्षावरील मतदारांमध्ये जागृतीसाठी बुधवारी काढलेल्या मतदार रॅलीत सहभागी विद्यार्थिनींनी सेल्फीद्वारे रॅलीचा क्षण टिपला.

# मतदार जनजागृती रॅलीने कोल्हापूर दुमदुमले

## एनएसएस, एनसीसी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : 'मतदान - एक मत, एक मूल्य', 'एकच लक्ष - मताचा हक्क' अशा घोषणांनी मतदार जनजागृतीपर रॅलीने कोल्हापूर शहर दुमदुमले. बिंदू चौकातून निघालेल्या या मतदार जनजागृती रॅलीतून मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, अशा घोषणाही एनएसएस, एनसीसी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींनी दिल्या.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त १८ वर्षांवरील मतदारांमध्ये मतदानाच्या जागृतीसाठी काढण्यात आलेल्या मतदार रॅलीस बिंदू चौकात अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरवात झाली. बिंदू चौकातून निघालेली मतदार जागृती रॅली पुढे शिवाजी चौक, महानगरपालिका, दसरा चौक या मार्गावरून शाहू स्मारक भवन येथे आली. या रॅलीत शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग होता. या वेळी कुलसचिव विलास नांदिवडेकर, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार उत्तम दिघे, एनसीसी ऑफिसर डॉ. आर. एस. नाईक उपस्थित होते.

26 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# लोकशाही बलशाली करण्यास सक्रिय व्हा

## विश्वास नांगरे-पाटील : मतदार जनजागृतीसाठीच्या शासकीय कार्यक्रमात मांडले विचार

**कोल्हापूर :** लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला गती निर्माण होते. मतदानाची सुटी ही चैनीसाठी नसून ती राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी आहे, याची जाण ठेवावी असे आवाहन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुधवारी शाहू स्मारक भवनमध्ये मतदार जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी हे होते; तर समारंभास मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, पोलिस अधीक्षक एम. बी. तांबडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर, विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदिवडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी सैनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुधवारी शाहू स्मारक भवनमध्ये पोलिस अधीक्षक एम. बी. तांबडे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, जिल्हाधिकारी अमित सैनी, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी रवींद्र खाडे यांनी मतदार शपथ घेतली.

या समारंभात विविध स्पर्धेतील विजेत्यांचा तसेच उत्कृष्ट बीएलओ यांचा सत्कार करण्यात आला.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र खाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कोगे येथील न्यू हायस्कूलची विद्यार्थिनी प्राची निकम हिने विचार मांडले. प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आभार मानले. समारंभास महापालिका उपायुक्त ज्ञानेश्वर ढेरे, तहसीलदार उत्तम दिघे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

26 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Voting strengthens democracy: Patil

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Special inspector general, Kolhapur range, Vishwas Nangre Patil on Wednesday said that everyone should exercise their right to vote to strengthen the democracy.

He was speaking at a programme on National Voters Day held at Shahu Smarak Bhavan, here.

January 25, the foundation day of the Election Commission of India, is celebrated as National Voter Day to promote participation in elections and increase voter enrolment, especially of those in the age-group of 18 to 19 years.

The district administration observed the day with a morning rally and an awareness programme.

Statistics show that the percentage of young voters is negligible in total voting. Therefore, the National Voter Day has been observed since 2011.

Patil said, "We should exercise voting rights on a priority basis. An empowered democracy paves way for development. People should keep in mind that a holiday on the voting day should be used for voting instead of sitting at home. Voting is an important process in democracy. We should be become the factor of democratic transformation and encourage others too."

Rahul Gaikwad




Students participate in the National Voters Day rally in the city on Wednesday

**Statistics show that the percentage of young voters is negligible in total voting. Therefore, the National Voter Day has been observed**

District collector, Amit Saini, said, "People above the age of the 18 years should enrol themselves in the voter list. We have introduced a true voter application, where voters can get information such as their name and number in just a click."

The voters' awareness really started from Bindu Chawk and crossed important locations such as Shivaji statue, municipal corporation and Dasra chawk to conclude at Shahu Smarak Bhavan. The National Cadet Corps, college students and common citizens took part in the rally.